**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ८**
**सन.२००७-२००८**

विषय क्रमांक :-१ बुधवार दिनांक १९/९/२००७

ठराव क्रमांक :- १ बुधवार दिनांक १९/९/२००७

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती सभा दिनांक १०/९/२००७ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकुर :-** मा.स्थायी समिती सभा दिनांक १०/९/२००७ रोजी झालेल्या मा.स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त कायम करणे साठी मा.स्थायी समिती पुढे ठेविले.

सबब कार्यवृत्त मा.स्थायी समिती पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असता त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.श्री. जोशी अ.सु. :- कार्यवृत्त मंजूर करण्यांत यावे, कुनाच्या सुचना असल्यास पहाव्यात.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- मा. सदस्यांनी इतिवृत्ता बाबत सुचना सांगाव्यात.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं.:- दिनांक १०/९/०७ रोजी चे सभे मध्ये दिनांक ३/८/२००७ रोजीचे सभेचे कार्यवृत्त कायम करतांना मी पुढील वर्षाचे वार्षिक खरेदी कामी जाहीर निविदा दर मागवितांना मान्यता प्राप्त कंपणीचे ऑथराईज डिलर सब डिलर यांचेच दर स्विकारले जातील अशी अट नमुद करून जाहीर निविदा दर मागविणेत यावेत अशी सुचना केली होती तसा ठराव ही मंजूर केलेला आहे. त्याप्रमाणे प्रशासनाने निर्णय घेतला किंवा कसे.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- त्याप्रमाणे कार्यवाही करण्यांचे सुरू केले आहे.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- सारसनगर येथील नवीन पुलाचे कामासाठी जुना पुल तोडल्या नंतर तेथील वाहतुकीचे डायव्हर्शन करण्यासाठी जागा नसल्याने वाहतुकी साठी पर्यायी व्यवस्था नाही. शहर अभियंता यांनी जागा पहावी असे मा.उपायुक्त साहेबांनी सुचविले होते. सदर पुला वरून होणा-या वाहतुकीचे डायव्हर्शनचे जबाबदारीचे काय ?.

मा.उपायुक्त श्री.हांगे साहेब:-संबंधीत ठेकेदाराचीच सदरचे वाहतुकीचे डायव्हर्शनची जबाबदारी आहे.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- कानडे मळा व चिपाडे मळा येथील नाल्या वरील दोन्ही पुलांची कामे महिन्या भरात करावी लागतील.

शहर अभियंता श्री.पालवे व्ही.डी.:-आपण सदर जागांची संयुक्त पहाणी करून पुढील कारवाई करू.

मा.श्री. जोशी अ.सु. :- पर्यायी व्यवस्था करावी.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- सारसनगर पुलाचे जागी डायव्हर्शन साठी जागा नाही कानडे मळा चिपाडे मळा येथील पुलासाठी दहा ते पंधरा लाख रूपये खर्च करावे लागतील पर्यायी व्यवस्था झाले शिवाय सारसनगर पुलाचे काम सुरू करू नये.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- आपण मागील सभेत कानडे मळा चिपाडे मळा येथील नाल्या वरील पुलांची डागडूजी करणे बाबत सुचना केली होती. शहर अभियंता यांना जागा पहाणी करणे बाबत सांगितले होते. त्यांनी त्या विषयी अहवाल द्यावा.

मा.श्री. जोशी अ.सु. :- कानडे मळा चिपाडे मळा येथील कामांचे एस्टीमेट करावे सदर कामे कायम स्वरूपाची होतील हे पहावे.

मा.श्री. तिवारी सु.र. :- माझे भागातील संडासाचे कामासाठी जुने संडास तोडल्या नंतर तेथील नागरिकांनी मोर्चा आणला होता.तसा प्रसंग येउ नये.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- सारसनगर पुला वरील वाहतुकी बाबत पर्यायी व्यवस्था करणेत येईल.

मा.श्री. त्रिपाठी सु.च. :- इतिवृत्त मंजूर करावे.

मा.श्री. तिवारी सु.र. :- इतिवृत्त मंजूर करावे.

मा.सभापती साहेब :- कार्यवृत्त सर्वानुमते मंजूर.

**<u>ठराव</u>** :- मा.स्थायी समिती सभा दिनांक १०/९/२००७ रोजीचे सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

सुचक :- मा.श्री. त्रिपाठी सु.चं.

अनुमोदक :- मा.श्री. जोशी अ.सु.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-८**
**सन २००७-२००८.**

विषय क्रमांक-२ बुधवार दिनांक १९/९/२००७

ठराव क्रमांक-२ बुधवार दिनांक १९/९/२००७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील केडगांव इंडस्ट्रीअल इस्टेट ते नगर-पुणे हायवे ते केडगांव देवी रोड वरील नाल्या पर्यत ३०० व ४५० एम एम एन पी २ क्लास आर सी सी ड्रेनेज लाईन टाकणे कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदाधारक श्री. राजेंद्र जाधव,अहमदनगर यांचे कमीचे निविदा दरास मंजूरी मिळणेबाबत ऑफीस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** विषय-अ.नगर म.न.पा. हद्दीतील इंडस्ट्रीयल इस्टेट ते नगर-पुणे हायवे ते केडगांव देवी रोड वरील नाल्या पर्यत ३०० व ४५०एम एम एन पी २ क्लास आर सी सी ड्रेनेज लाईन टाकणे बाबत.

अहमदनगर औद्योगिक वसाहत केडगांवचे अंतर्गत ड्रेनेज लाईन टाकणेचे कामास मा.प्रशासकीय ठराव नं.३६ दिनांक.६/९/२००६अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली. सदर ठरावामध्ये एकूण अंदाजपत्रकाच्या ३०% रक्कम चेअरमन इंडस्ट्रीयल इस्टेट,अ.नगर यांचे कडून जमा करून घ्यावी असे नमुद केले आहे.

सदरची प्रस्तावीत ड्रेनेज लाईन औद्योगिक वसाहती मधुन नगर-पुणे हायवे क्रॉस करून केडगांव देवी रोड वरील नाल्या पर्यत टाकण्यात येणार आहे. त्यामुळे औद्योगिक वसाहती व्यतिरिक्त अमितनगर,एकता कॉलनी, ताराबाग हौ.सोसा. इत्यादी भागाचा प्रश्न कायमस्वरूपी सुटु शकेल.

सदर कामाचे अंदाजपत्रक सन २००६-२००७चे दरसुची नुसार करण्यात आले असुन सदर कामास एकूण रू. ३२,७८,९५१/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चास मा. महासभा ठराव नं.८ दि.२७/४/२००७ अन्वये उपरोक्त काम म.न.पा. फंडातून करणेस प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असुन सदर कामास तांत्रिक मान्यता मिळाले नुसार सदर कामाची जाहीर निविदा मागविण्यांत आली.

प्राप्त निविदांमधे श्री. राजेंद्र जाधव,अ.नगर यांचे आलेले दर निविदा दरापेक्षा २६.५०% जादा परंतु सर्वात कमी दराचे प्राप्त झाले. सदर दराबाबत दि. २१/८/२००७ रोजीच्या छाननी समिती मध्ये झालेल्या वाटाघाटी नुसार निविदा धारकास निविदा दरापेक्षा १९.९९ % जादा दराने काम देणेस शिफारस करण्यात आली. त्या नुसार सदरच्या वाटाघाटीचे दरास मंजुरी मिळणेस्तव रिपोर्ट मा.स्थायी समितीपुढे सविनय सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :-ऑफीस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफीस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- केडगांव इंडस्ट्रीअल इस्टेट यांचे खर्चाचा भाग म्हणून सदर कामाचे तीस टक्के रक्कम ते आपले कडेस वर्ग करणार का?

मा.श्री. जोशी अ.सु. :- हा प्रस्ताव कुनी तयार केला आहे. त्यांना सभे मध्ये बोलवावे तीस टक्के रक्कम वर्ग करण्याचे त्यांनी मान्य केलेले आहे का? त्यांनी रक्कम वर्ग करण्यांस नकार दिल्यास पुढे काय करणार?

शहर अभियंता श्री. पालवे व्ही.डी. :- तेथे ड्रेनेज लाईन टाकणे आवश्यक असल्याचे त्यांनी कळविलेले आहे. तसेच सदर रक्कम भरण्यांस ते तयार आहेत.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :-या कामासाठी आपण हायवे मार्ग क्रॉस करणार आहोत सदर रस्ता खोदाई साठी पी.डब्ल्यु.डी ची संम्मती आहे का? मेहेर कॉलनी येथील पाणी पुरवठयासाठी हायवे मार्ग खोदण्यास पी.डब्ल्यु.डी ने परवानगी दिली नाही त्या मुळे मेहेर कॉलनी येथील काम झालेले नाही हया कामासाठी पी.डब्ल्यु.डी ची परवानगी मिळणार का ?

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- पाणी पुरवठया सारखा प्रश्न असल्यामुळे त्यासाठी परवानगी मिळले.

मा.श्री. जोशी अ.सु. :- पी.डब्ल्यु डी चे ताब्यातील रस्त्यावर आपल्याला खर्च करता येत नाही. त्यांची संम्मती घेउन रस्त पॅचिंग ची कामे करणे विषयी स्थायी समिती ने ठरविले होते परंतु रस्ता पॅचिंगची कामे झालेली नाहीत. दत्त मंदिरा समोरील प्रेमदान चौक रस्त्यावरील खड्डे बुजविणेचे काम म.न.पा. करीत नाही रस्ता पी.डब्ल्यु.डी चे ताब्यातील आहे.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- शाखा अभियंता श्री. मेहत्रे आर.जी. यांना सभे मध्ये बोलवावे.

त्या प्रमाणे शाखा अभियंता श्री. मेहत्रे आर.जी .सभे मध्ये उपस्थित झाले.

शाखा अभियंता श्री. मेहत्रे आर.जी. :- पुलाचे सीडी वर्क आहे तेथून लाईन टाकणेत येईल त्यामुळे सदर रस्ता खोदाईचा प्रश्न येत नाही.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- सदर रस्ता लवकरच चौपदरी होणार आहे.अशी आडचणीची कामे आताच कायम स्वरूपी केली तर भविष्यात अडचण येणार नाही मेहेर कॉलनी चे पाईप लाईनेचे काय ?

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब:- मेहर कॉलनीचे पाण्याचे अडचणी संबंधी पी.डब्ल्यु डी शी केलेलला पत्रव्यवहार आहे का?

शाखा अभियंता श्री. मेहत्रे आर.जी. :- एस.टी. स्टॅन्ड जवळील मेहेर कॉलनीचे पाईप लाईन बाबत पी डब्ल्यु डी शी पत्रव्यवहार केलेला नाही.

मा.श्री. जोशी अ.सु. :- जनरल बोर्डा मध्ये परवानगी नसलेने काम करता येणार नाही असे सांगितले होते. अशा बाबतचे चर्चेचा उल्लेख जनरल बोर्डाचे ठरावा मध्ये असेल.

मा.श्री. शेख मुदस्सर अ.इ. :- बोट टाईप गेस्ट हाउस/ मुकुंदनगर भागासाठी मुख्य वाहीनीतुन आठ इंची पाईप लाईन बाबत बी. ॲन्ड सी शी पत्रव्यवहार करावा.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- पी. डब्ल्यु डी शी पत्रव्यवहार करून मेहेर कॉलनीचे पाण्याच्या पाईप लाईनचे काम पूर्ण करून घेउ त्या कामासाठी त्यांची परवानगी मिळेल शहर अभियंता यांनी मेहर कॉलनी, मुंकुदनगर इत्यादी भागातील पी डब्ल्यु डी शी संबधीत रस्ता क्रॉस करणे रस्ता खोदाई इत्यादी मुळे अडलेली कामे असतील त्याचा एकत्रीत प्रस्ताव तयार करून पत्रव्यवहार करावा.कामे त्वरीत पूर्ण करून घेणे बाबत कार्यवाही करावी.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- आपण तीस टक्के रक्कम केडगांव इंडस्ट्रीअल इस्टेट यांचे कडून भरून घेणार आहोत ती तीस टक्के रक्कम मुळ एस्टीमेटचे कि होणारे खर्चाचे रकमेवर घेणार आहोत.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- जो खर्च होईल त्यावर तीस टक्के रक्कम भरून घेउ.

मा. श्री. त्रिपाठी सु. चं :- प्रस्ताव मंजूर करावा.

मा.श्री. बोरूडे अ.व :- ऑफीस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफीस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर. तसेच एस.टी.स्टॅन्ड जवळील मेहेर कॉलनी या कॉलनी मधील पिण्याच्या पाईल लाईनचे प्रलंबीत काम त्वरीत पूर्ण करून घेण्यांत यावे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका हद्यीतील केडगांव इंडस्ट्रीअल इस्टेट ते नगर-पुणे हायवे ते केडगांव देवी रोड वरील नाल्या पर्यत ३०० व ४५० एम एम एन पी २ क्लास आर सी सी ड्रेनेज लाईन टाकणे कामी मागविण्यांत आलेल्या व छाननी समिती मध्ये झालेल्या वाटाघाटी नुसार स्पर्धात्मक दृष्टया कमीचे निविदाधारक श्री. राजेंद्र जाधव,अहमदनगर यांचे निविदा दरापेक्षा १९.९९% (एकोणीस पॉईट नव्याण्णव टक्के ) जादाचे दरास मंजूरी देण्यात येत आहे. ऑफीस रिपोर्ट मंजूर.

तसेच एस.टी.स्टॅन्ड जवळील मेहेर कॉलनी या कॉलनी मधील पिण्याच्या पाईल लाईनचे प्रलंबीत काम त्वरीत पूर्ण करून घेण्यांत यावे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री. बोरूडे अ.व.

अनुमोदक :- मा.श्री. त्रिपाठी सु.च.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती

स्थायी समिती

अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-८**
**सन २००७-२००८.**

विषय क्रमांक-३ बुधवार दिनांक १९/९/२००७

ठराव क्रमांक-३ बुधवार दिनांक १९/९/२००७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर शहरातील मुख्य सहा रस्त्यांचे रूंदीकरण मजबुती करण व डांबरीकरणा सह सुशोभिकरण करणे कामी जादाचे कामामुळे वाढीव भाव वाढीस व वाढीव रकमेस मंजूरी मिळणे बाबत ऑफीस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** विषय- अ.नगर शहरातील मुख्य सहा रस्त्यांचे रूंदीकरण, मजबुतीकरण व डांबरीकरणासह सुशोभिकरण करणे .

अ.नगर शहरातील मुख्य सहा रस्त्यांचे रूंदीकरण, मजबुतीकरण व डांबरीकरणासह सुशोभिकरण करणे. कामाचे मंजुर अंदाजपत्रकातील तरतुदी नुसार निविदा निश्‍चिती झालेली आहे. अंदाजपत्रक तयार करतांना प्रचलीत पध्दत तसेच प्राप्त सुचना नुसार आढावा प्रमाणे खालील बदल प्रमुख्याने होत आहे.

१] ६ मि.मि. सिलकोट ऐवजी १२ मि.मि. सिलकोट धरणे.

२] ओपन गटर ऐवजी पाईपचे बंदिस्त गटर चेंबरसह बांधणे.

३] रस्ता रूंदीकरण, गटर खोदाई यामधुन निघालेली माती इतरत्र हलविणे.

वरील बदलान्वये निव्वळ वाढ ३५,०५,१०३/- होत आहे. सदर बाबीं या एक्स्ट्रा आयटम अंतर्गत असल्याने तेवढयाच रकमेचा वाढीव खर्च या कामांवर पडणार आहे. वाढीव तरतुदीमुळे रस्त्याचा टिकावुपणा, पाईप गटारांची उपयुक्तता, (Functioning) या मध्ये भर पडणार आहे.

हॉटेल इंम्पीरियल चौकातील २४०मी.लांबीतील अतिक्रमण काढल्याने पुर्ण रूंदीस डांबरीकरण करावयाचे आहे. या वाढीव कामाची किंमत रू.६,९०,८६९/-येत असल्याने व काम तातडीने हाती घ्यावयाचे असल्याने (पुन्हा अतिक्रमण होवु नये या दृष्टीने)सदर काम मुळ ठेकेदाराकडून करून घेणेत यावे असे वाटते. मुळ निविदेच्या अनुषंगाचे काम पुर्ण झाल्यांनतर या कामावरील आर्थिक चित्र अंदाजे खालीलप्रमाणे असे.

| | | |
|---|---|---|
| १. | प्रशासकीय मंजुरी किंमत | १,३२,५४,५३०/- |
| २. | निविदा रक्कम (परिशिष्ट 'ब') | १,२१,७३,१७८/- |
| ३. | ठेकेदाराचा देकार | २१.२० % जादा |
| ४. | ठेकेदारांच्या देकारानुसार होणारी कमाची किंमत | १,४७,५३,१७८/- |
| ५. | एक्स्ट्रा आयमटमाची किंमत (स्टेटमेट नुसार ) | ३५,०५,११३/- |
| ६. | हॉटेल इंम्पिरियल रस्त्याच्या रूंदीकरणाची किंमत (५,७०,०२४/- x२१.२०%= ६,९०,८६९/-) | ६,९०,८६९/- |
| ७. | अंदाजित भाववाढ | ५,००,०००/- |
| ८. | कामावरिल संभाव्य खर्च (४+५+६+७) | १,९४,४९,१६०/- |

सदर ठेकेदारांकडून निविदाप्रमाणे काम तातडीने करून घ्यावे. सदर रस्त्यावर प्राप्त परिस्थितीनुसार उद्‌भवणारे वाढीव काम स्वतंत्रपणे प्रस्ताव करून करावेत. असे वाटते. मुळे ठेकेदारास वाढीव कामांमुळे मुदतवाढ द्यावी लागणार आहे. त्यामुळे देयभाव वाढीची रक्कमही वाढतच राहणार आहे.

यास्तव कामावरील वाढीव भाववाढ व वाढीव रक्कम मंजुरीसाठी विषय स्थायी समितीच्या समोर अंतर्भुत करणेस सविनय सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे.
सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर शहरातील मुख्य सहा रस्त्यांचे रूंदीकरण मजबुती करण व डांबरीकरणा सह सुशोभिकरण करणे कामी जादाचे कामामुळे वाढीव भाव वाढीस व वाढीव रकमेस मंजूरी मिळणे बाबत ऑफीस रिपोर्ट.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असता त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.श्री. जोशी अ.सु. :- हया कामामध्ये वाढीव कामे कोण कोणती घेतली आहेत ते सांगावे.

मा.उपायुक्त श्री.हांगे साहेब :- शहर अभियंता यांनी माहिती सांगावी.

शहर अभियंता श्री. पालवे व्ही.डी. :- डांबरी करण, सहा मी.मी. ऐवजी बारा मी.मी. सिलकोट धरले आहे. पी.सी.सी. ओपण गटर ऐवजी बंदिस्त गटर धरली आहे. रस्ता रूंदीकरण इत्यादी वाढीव कामामुळे एस्टीमेट वाढते वाढीव खर्च पस्तीस लाख होतो.

मा.श्री.त्रिपाठी सु.चं.:-ओपण गटरचे एस्टीमेट कमी होते.पूर्वी ३०० mm ची गटर होती ती ४०० mm ची धरली.

मा.श्री. तिवारी सु.र. :- पूर्वी २६-२७ लाखाचे एस्टीमेट झाले होते.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- पूर्वीचे एस्टीमेट पेक्षा डिटेल आयटेम घेतल्याने एस्टीमेट वाढून ३५ लाखाचे झालेले आहे.

मा.श्री.तिवारी सु.र:- हेच काम सहा महिन्यांनी वाढीव कामासह मंजूरीला येईल का. ?

मा.श्री. जोशी अ.सु. :- सदर कामांस मा.महासभेने दिनांक १९/२/२००५ मंजूरी दिली निविदा मागवून ओपण करून दिनांक २१/२/२००७ रोजी कामाचा शुभारंभ झाला आता वीस टक्के काम झाले आहे. परंतु कामांचे अर्धवट एस्टीमेट केलेले आहे. फुटपाथ इत्यादी धरलेले नाहीत.गटर ४०० एम.एम.धरली आहे. तेथील वस्ती पहाता ८००एम.एम.पाईप गटर धरणे आवश्यक होते.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- भाव वाढले काम वाढले तर एस्टीमटे वाढते.

शहर अभियंता श्री. पालवे व्ही.डी. :- फुटपाथ व वाढीव कामे यांचे स्वतंत्र प्रस्ताव तयार करून ती कामे पूर्ण करून घेउ.

मा.उपायुक्त श्री.हांगे साहेब :- या कामाचे टेंडर काढलेले आहे आयटेम बदलेले रस्ता वाढीव घेतला फुटपाथ प्रस्तावीत केलेले आहेत हे काम दूस-याला देउ रस्तांची कामे होणे आवश्यक आहे.

मा.श्री. जोशी अ.सु. :- मी सुचविलेल्या रस्त्यांच्या साईड पट्टया रवोदून ठेवल्या खड्डे बुजविणेचे काम झालेले नाही. बसविण्यांस सांगितले नाही तरी हायमास्ट बसविला पुन्हा काढून नेला आता तेथे साधा सोडीयम व्हेपर दिवा तरी लावावा सिमेंट पाईप लाईनची कामे अडलेली आहेत. त्यांचा अद्यापी खरेदीचा प्रस्ताव नाही.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- वादळा पूर्वी पंपिंग स्टेशनचे डी.पी. ला सपोर्ट दिला असता तर डी.पी.चे. सात आठ लाखाचे नुकसान झाले ते झाले नसते वादळ आले डी.पी.चे नुकसान झाले नंतर सदर डि.पी.चे काम युध्द पातळीवर पूर्ण केले इतर कामे ही तशीच पूर्ण करावीत.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- पाहिजे त्या प्रकारचे पाईप बाजारात उपलभ्द नव्हते सिमेंट पाईप मागवून कामे करून घेउ शहर अभियंता यांनी आवश्यक कारवाई करून जोशी साहेबांची कामे एक महिन्यामध्ये करून घ्यावीत.

मा.श्री. जोशी अ.सु. :- डी.एस.आर रेट व मार्केट रेट मॅच होत नाहीत.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- मॅच होउच शकत नाहीत.

मा.श्री. जोशी अ.सु. :- मॅच होत नाहीत त्यामुळे ब-याच कामामध्ये वाढीव खर्चाचा प्रश्न नेहमीच उद्‌भवतो  डी.एस.आर.रेट व मार्केट रेट यांची पडताळणी करून मा.आयुक्त साहेबांनी आपल्या मनपा साठीची दर सुची ठरवून कामे करावीत.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- डी.एस.आर रेट व बाजार भाव यांचा मध्य काढून कामे करावीत त्यामुळे टेंडर प्रोसिजर वाढणार नाही.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- हया कामाचे टेंडर काढले ते सन २००७-२००८ चे दर सुचीनुसार नाही भाव वाढ दहा टक्के चे आत देता येत असते हे टेंडर दहा टक्केचे आंत आहे. प्रशासन दहा टक्के वाढीव दरापेक्षा जादाचे दर स्विकारू शकत नाही.

मा.श्री.जोशी अ.सु. :- भाव वाढ पाच लाख धरली आहे. भाव वाढ होणार का?

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :-डॉ. बाबासाहेब आंबेडकर रस्ता वरील अतिक्रमणामुळे रस्त्याचे काम पूर्ण होत नाही. त्यांचे पुर्नवसन करावे.

मा.श्री.मैड स.ब.:- विषय जनरल आहे. पुर्नवसन होते म्हणून आणखी झोपडया येतील मग प्रश्न सुटणार कसे.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- शासन निर्णयाप्रमाणे दिनांक १/१/१९९५ पूर्वीचे सरकारी  जागे वरील झोपडयांचे पुर्नवसन होउ शकते. म.न.पा  आपले हद्दीतील डी.पी. रोड वरील खाजगी मालकीच्या जागा धारकांना पुर्नवसनाचा  मोबदला देउ शकते असा जी.आर आहे या सबंधी मोर्चा आला होता एकाने खाजगी मालकी चा पुरावा सादर केला त्याचे पुर्नवसन करण्याची प्रत्यक्ष माझी जबाबदारी आहे.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं., मा.श्री. तिवारी सु.र. व मा.श्री. जोशी अ.सु. :- ठेकेदारांचे कामाची बीले कामे झाल्या नंतर लवकरात लवकर देण्यांत यावीत त्यांने कामे लवकर होतात.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- हया कामास उशीर झालेला आहे ती लवकर पूर्ण व्हावीत.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- किती काम झालेले आहे.

मा.श्री. जोशी अ.सु. :- निम्मेचे वर कामे झालेले आहे.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- काम पूर्ण झाले नाही त्या कामाचे पैसे दिले जातात सहकार सभागृह ते महात्मा फुले चौका पर्यतच्या रस्त्यांचे काम कसे आहे.

मा.उपायुक्त श्री . हांगे साहेब :- क्वॉलीटी  कंन्ट्रोल चा रिपोर्ट मागविलेला आहे. ती सोय आपले कडे नाही. तो प्राप्त झाले नंतर कामाची बीले देउ तात्पुरते पेमेंट करणेचा आदेश आहे.

मा.श्री. तिवारी सु.र. :- रस्त्यांचे काम ठेकेदाराने पूर्ण केले रस्त्याचे केलेले काम पावसामुळे वाहून गेले तर ठेकेदाराने काय करायचे आपण जागा पाहिली तर काम झाल्याचे वाटत नाही.काम तर केलेले असते अशा प्रकरणी ही साहेबांनी मार्ग काढावा.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- ऑफीस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. तिवारी सु.र. :- मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- प्रस्ताव सर्वानुमते मंजूर.

**ठराव** :- अहमदनगर शहरातील मुख्य सहा रस्त्यांचे रूंदीकरण मजबुती करण व डांबरीकरणा सह सुशोभिकरण करणे कामी जादाचे कामामुळे होणा-या खर्चासह, भाव वाढीचा खर्च मिळून सदर कामासाठी येणा-या एकूण संभाव्य खर्च रूपये १,९४,४९,१६०/- (रूपये एक कोटी चौ-याण्णव लाख एकोणपन्नास हजार एकशे साठ फक्त ) चे खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफीस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री. तिवारी. सु.र.

अनुमोदक :- मा.श्री. बारस्कर पो.ज.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-८**
**सन २००७-२००८.**

विषय क्रमांक-४ बुधवार दिनांक १९/९/२००७

ठराव क्रमांक -४ बुधवार दिनांक१९/९/२००७

**प्रस्तावाचा विषय :-** एकात्मीक शहर विकास योजने अंतर्गत नगररचना योजना क्र.४ अं.भू.क्र. २६२ मिस्कीन मळा सावेडी येथे बगीचा विकसीत करणे कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा धारक श्री.ए.सी.शेख यांचे निविदा दरास मंजूरी मिळणे बाबत ऑफीस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** विषय,- एकात्मीक शहर विकास योजना अंतर्गत नगररचना योजना क्र.४ अ.भु.क्र.२६२, मिस्कीन मळा, सावेडी येथे बगीचा विकासत करणे या कामाच्या निविदेच्या तुलणात्मक तक्त्या बाबत.

(अंदाजपत्रकीय रक्कम रू. ९९,४५,९७९/-)

विषयांकीत काम रक्कम रू. ९९,४५,९७९/- च्या अंदाजपत्रकास मा.स्थायी समिती सभा ठराव क्र. ३ दिनांक १३/९/२००६ अन्वये प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळाली आहे.

त्या अनुषंगाने दिनांक २९/५/२००७ रोजी दैनिक लोकसत्ता या वर्तमान पत्रात प्रसिध्दी देण्यात येउन को-या निविदा फॉर्मची विक्री दिनांक २५/६/०७ ते दिनांक १०/७/०७ अखेर करण्यात येउन सिलबंद निविदा दिनांक १६/७/०७ रोजी स्विकारण्यात आल्या. सदर कामाच्या एकुण ३ फेरनिविदा प्राप्त झाल्या होत्या व त्या मा. उपायुक्त यांचे दालनात दिनांक २०/७/०७ रोजी उघडण्यात आल्या असता त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.नं. | निविदा धारकांचे नांव | भरलेले दर % |
|---|---|---|
| १. | श्री. ए.सी.शेख | २९ %जादा |
| २. | श्री. ए.सी. कोठारी | २९.२९% जादा |
| ३. | श्री. आरडे इले. | ४० %जादा |

उपरोक्त ३ निविदापैकी ठेकेदार श्री.ए.सी.शेख यांची निविदा सर्वात कमी दराची म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २९% जादा असल्याने ठेकेदारास दिनांक २१/८/२००७ रोजीच्या छाननी समितीमध्ये संबंधीत ठेकेदारास काम २३.५०% जादा दराने देणेचे असुन मा.आयुक्त साहेब यांनी दि. ३/९/०७ रोजी मान्यता दिलेली आहे.

१] विषयांकित कामाचे अंदाजपत्रक सन २००६-०७च्या जिल्हा दरसुचीवर आधीत आहे.
२]महाराष्ट्र जिवन प्राधिकरण यांची सन२००६-०७च्या जिल्हा दरसुचीतील दर लागु करण्यात आले आहेत.
३] निविदेमध्ये Star Rates अथवा Escalation ची तरतुद नाही व ठेकेदारास कोणत्याही प्रकारे Star Rates अथवा Escalation ची रक्कम अदा केली जाणार नाही.
४] अंदाजपत्रकात ठेकेदारास ४% व्हॅट टॅक्सचा समावेश नाही.

सबब विषयाकिंत कामी श्री. ए.सी.शेख यांची सर्वात कमी दराची म्हणजे २३.५० % जादा दराची होणारी निविदा मा.स्थायी समितीपुढे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३(क) नुसार संविदा मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे. तरी कृपया सदरचा विषय मा. स्थायी समितीच्या सभेत अंतर्भुत करणेस सविनय सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-**एकात्मीक शहर विकास योजने अंतर्गत नगररचना योजना क्र.४ अं.भू.क्र.२६२ मिस्कीन मळा सावेडी येथे बगीचा विकसीत करणे कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा धारक श्री.ए.सी.शेख यांचे निविदा दरास मंजूरी मिळणे बाबत ऑफीस रिपोर्ट.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असता त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- ऑफीस रिपोर्ट वाचून दाखववावा.

त्या प्रमाणे ऑफीस रिपोर्ट वाचून दाखविणेत आला.

मा.श्री. तिवारी सु.र. :- हया कामाचे पूर्वी टेंडर काढले होते ते दिनांक १३/४/२००७ रोजी उघडलेले आहे. पांच जणांचे निविदामध्ये आरडे इलेक्ट्रीकल्स यांची १९.४ % कमीचे दराची निविदा होती ते वाटाघाटी साठी आले होते. छाननी समिती समोर ते दर कमी करण्यांस तयार झाले नाहीत. म्हणून फेर निविदा मागविण्यांत आल्या आता २९% जादाचे दर आले आहेत संबंधीत ठेकेदास काम २३.५० % जादा दराने देणेसाठी स्थायी समिती पुढे प्रकरण आलेले आहे.

मा.श्री. जोशी.अ.सु.:- छाननी समितीस फेरनिविदा मागविणेचा अधिकार आहे का. ?

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- आलेल्या निविदा ओपण केल्या नंतर छाननी समितीपुढे दराचा अहवाल ठेवला जातो.त्याचे रिपोर्टासह अहवाल मा.आयुक्त साहेब यांचे कडेस सादर केला जातो. मा.आयुक्त साहेबांना फेर निविदा मागविणेचा अधिकार आहे.

लेखाधिकारी श्री.कर्डील.पी.बी :- लोएस्ट निविदा दरास मान्यता देणे योग्य आहे. फेर निविदा २९% जादाचे दराच्या आलेल्या आहेत मागविण्यात येणा-या निविदावर महिन्या भरा मध्ये कार्यवाही पूर्ण व्हावी परंतु आपले कडेस जादा मुदत लागते निविदा रिकॉल केल्यास जादाचे दर येतात.

मा.श्री. तिवारी सु.र. :- १९.४ टक्के जादाचे दरात काम करण्यांस आरडे इलेक्ट्रीकल्स तयार होते त्यांनी तसे पत्र दिले होते परंतु ते मुदतीत न दिल्याने प्रशासनाने ते स्विकारले नाही.

मा.श्री. जोशी अ.सु.:- आरडे इले. यांची १९.४%कमी दराची निविदा छाननी समितीने मंजूर केली नाही.आता जादाचे दर प्राप्त झाले या कामाची फेर निविदा मागविण्याचे कारण काय ?१९.४ %जादा दराची निविदा मंजूर होत नाही त्या पेक्षा जादा दराची निविदा मंजूरीसाठी स्थायी समिती पुढे येते. या प्रकरणी नुकसानी ची जबाबदारी निश्चित करून त्या बाबत कार्यवाही व्हावी छाननी समिती फेर निविदा कशी मागविते. कमीचे टेंडर का नाकारले याचा खुलासा करावा.

मुख्य लेखा परिक्षक श्री.कदम :-छाननी समिती निविदा बाबत शिफारस करू शकते निर्णय घेउ शकत नाही.

मा.श्री. जोशी अ.सु. :- फेर निविदा मागविणेचा निर्णय प्रशासनाचा होता का ?

लेखाधिकारी श्री. कर्डील पी.बी. :- लेखी कारणे देउन फेर निविदा मागविणेचा निर्णय प्रशासन घेउ शकते. या कामाच्या फेर निविदा मागविलेल्या आहेत.

मा.श्री. तिवारी सु.र. :- यामध्ये श्री. शेख या निविदा काराचीच नविन निविदा आली आहे. मागील वेळी त्यांनी निविदा भरलेली नव्हती आता यांचेशी निगोशिएशन केलेले नाही. आता आरडे इले. यांचे ४०% जादाचे निविदा दर कसे? आले याचा विचार का केला नाही.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- मा.आयुक्त साहेबांनी छाननी समिती नेमलेली आहे. सर्वसाधारण पणे निविदा उघडणेची तारीख वेळ निविदाचे जाहीराती मध्ये असते आपले कडेस अशी पध्दत नाही. कमीचे निविदा धारकास आपण पत्र देउन वाटाघाटी साठी बोलावतो त्यांना सदर काम या पेक्षा कमीचे दरात करणेस तयार आहे किंवा कसे याची विचारणा केली जाते. काम करण्यांस ते तयार असल्यास त्यांचे निविदा दर स्विकारले जातात नकार दिल्यास छाननी समिती रिपोर्ट देते. छाननी समितीचे रिपोर्टासह अहवाल मा.आयुक्त साहेब यांचे कडेस सादर केला जातो अहवालानुसार निर्णय घेतला जातो टेंडर रिकॉल केले जाते.

मा.श्री. तिवारी सु.र. :- आरडे इले. यांना निगोशिएशन साठी आता बोलावले गेले नाही. कमीचे दरात कामे व्हावी असे स्थायी समितीला वाटते.सुधारीत एस्टीमेट तयार करून फेर निविदा मागवाव्यात.

मा.सभापती साहेब :- कमी दराची निविदा मंजूर न करता फेर निविदा मागविल्या असता जादा दराची निविदा प्राप्त झाली म.न.पा.चा आर्थिक फायदा होण्याचे दृष्टीने कमीचे निविदा धारकासह सर्व निविदा धारकांना स्थायी समितीचे वतीने मी पत्र दिले होते की, आपण भरलेल्या निविदा दरा मध्ये आपण किती दर कमी करू शकाल परंतु त्यांनी प्रतिसाद दिला नाही ते पत्र सभेत वाचून दाखवावे.

त्या प्रमाणे श्री. शेख ए.सी. यांना दिलेले पत्र सभे मध्ये वाचून दाखविले.

मा.उपायुक्त श्री.हांगे साहेब :- आरडे इले. यांनी या वेळी ४० % जादाचे दर दिल्याने त्यांना निगोशिएशन साठी बोलावू शकत नाही. कमीचे निविदा धारकास बोलावतो. कामास विलंब झाल्यास खर्च वाढतो कमीचे निविदा धारक श्री.. आरडे इले. यांनी पूर्वी कमीचे दरात काम करणेस तयार असले बाबत लेखी देण्यांस इन्कार केल्यामुळे फेर निविदा मागविल्या आहेत या कामाचे आलेले कार्यालयाने स्विकारलेले २३.५० % जादाचे दर करंट डि एस. आर रेट प्रमाणे ९.४७% जादाचे येतात ते मान्य करणे योग्य आहे. या बाबत शहर अभियंता यांनी माहिती सांगावी.

शहर अभियंता श्री. पालवे व्ही .डी :- आलेले निविदा धारक श्री.ए.सी. शेख यांचे कमीचे दर हे २३.५०% जादा दराचे असले तरी करंट डी.एस.आर रेटशी तुलना करता ते ९.४७ % जादाचे येतात ते स्विकारणे योग्य होईल परत फेर निविदाकामी नवीन एस्टीमेट करावे लागेल ते जादा रकमेचे होईल.

मा.श्री. जोशी अ.सु. :- या प्रकरणी फेर निविदा मागवाव्यात.असे माझे मत आहे.

मा.सभापती साहेब :- सदर प्रकरणी सभे मध्ये झालेल्या साधक बाधक चर्चे नुसार सदर कामी कमी दराची निविदा मंजूर न करता फेर निविदा मागविल्या असता जादाचे दर प्राप्त झाल्याने सदर कामाचे चालू जिल्हा दर सुची नुसार सुधारीत अंदाज पत्रक तयार करून सात दिवसांची शॅार्ट नोटीस देउन सदर कामी जाहिर निविदा दर मागविण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येत आहे.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं.:- नाही मा.सभापती साहेब या कामाच्या फेर निविदा मागविण्यांस माझा विरोध आहे.

**ठराव** :- एकात्मीक शहर विकास योजने अंतर्गत नगररचना योजना क्र.४ अं.भू.क्र. २६२ मिस्कीन मळा सावेडी येथे बगीचा विकसीत करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दरास मंजूरी मिळणे विषयी प्रशासनाने सादर केलेल्या ऑफीस रिपोर्टावर सभेमध्ये झालेल्या साधक बाधक चर्चे नुसार पुढील प्रमाणे सर्वानुमते निर्णय घेण्यांत येत आहे.

सदर कामाचे चालू जिल्हा दर सुची नुसार सुधारीत अंदाजपत्रक तयार करून सात दिवसाची शॉर्ट मुदतीची जाहिर नोटीस देउन जाहीर निविदा दर मागविणेस मंजूरी देण्यांत येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री. जोशी अ.सु.

अनुमोदक :- मा.श्री. तिवारी सु.र.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.